नि.दि.दा.क्र. ४४२/२०२२
सुनिल + 1 वि. अन्सारखान व इतर

**निशाणी क्र. ११ खालील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज वादीमार्फत आदेश ६ नियम १७ दिवाणी प्रक्रिया संहितेअंतर्गत दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. २ च्या नावाची दुरुस्ती करुन मिळण्याकरीता सादर केला आहे.

**२.** वादीचे थोडक्यात असे कथन आहे की, दावा बनवित असतांना अनावधानाने प्रतिवादी क्र. २ चे नावामध्ये चुक झाली. दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. २ चे नाव Jahed लिहिल्या गेले. मुळतः त्या ऐवजी Jahid असे नांव आवश्यक होते. सबब, त्या अनुषंगाने प्रतिवादी क्र. २ चे नावात दुरुस्ती करण्याची परवानगी मिळावी.

**३.** दोन्ही पक्षाचे कथन ऐकण्यात आले. प्रकरणाचे अवलोकन केले असता प्रस्तुतच्या प्रकरणातील प्रस्तावित दुरुस्ती बघितली असता ती केवळ तांत्रीक स्वरुपाची असल्याचे दिसुन येते. प्रस्तुतच्या प्रकरणात प्रतिवादी क्र. २ चे नावात दुरुस्ती केल्यास प्रतिवादीचे कुठलेही नुकसान होणार नाही. सबब मी या मतास आलो आहे की प्रस्तुतचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, आदेश खालील प्रमाणे.

**आदेश**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.
२. वादीने अर्जात नमुद केल्याप्रमाणे प्रतिवादी क्र. २ च्या नावाची दुरुस्ती पुढील तारखेपर्यंत करावी.

Digitally signed by Narendra SHRIKRISHNA Puri
Date: 2022.11.11 13:07:51 +0530

दिनांक : १०/११/२०२२
अकोला

**(नरेंद्र श्री. पुरी)**
५ वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर
अकोला.